# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 10 May 2024
# Time 18.10 to 18.20
# Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १० मे २०२४ सायंकाळी ६.१०

****

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याचा प्रचार उद्या संपणार–सर्वच राजकीय पक्षांचा प्रचार शिगेला
- मद्यधोरण प्रकरणी अटकेत असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना १ जून पर्यंत अंतरिम जामीन
- डॉ नरेंद्र दाभोलकर हत्येप्रकरणी दोघांना जन्मठेप आणि ५ लाख रुपये दंड–पुराव्या अभावी तिघांची सुटका

आणि

- औरंगाबाद लोकसभा मतदार संघात मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून प्रोत्साहन पुरस्कार

****

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याचा प्रचार उद्या संपत आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांच्या प्रचाराने आता जोर धरला आहे. या टप्प्यात मराठवाड्यातल्या औरंगाबाद, जालना आणि बीड लोकसभा मतदारसंघांसह राज्यातल्या नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघांमध्ये, येत्या १३ मे रोजी मतदान होणार आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नंदुरबार इथं महायुतीच्या उमेदवार हिना गावित यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. वंचित वर्गाच्या आरक्षणाच्या रक्षणासाठी आपण सदैव कार्यरत राहून अनुसूचित जाती जमाती आणि इतर मागासवर्गाचं आरक्षण कमी करुन धर्माच्या आधारे आरक्षण देऊ देणार नाही, याचा मोदी यांनी पुनरुच्चार केला. काँग्रेस मात्र या मुद्यावर काहीही बोलायला तयार नसल्याचा दावा त्यांनी केला. राष्ट्रपतिपदासाठी

द्रौपदी मुर्मू यांना विरोध, राम मंदिरासंदर्भात काँग्रेसची भूमिका या मुद्यांवरूनही मोदी यांनी टीका केली. सीकल सेल ॲनिमिया निर्मुलनासह नंदुरबारमधल्या विकासकामांचा दाखला त्यांनी दिला. प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होऊ शकतात अशा आशयाचं वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काही दिवसांपूर्वी केलं होतं. त्या अनुषंगाने बोलतांना, मोदी यांनी, उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना महायुतीमध्ये सहभागी होण्याचं आमंत्रण दिलं. दरम्यान, शरद पवार यांनी मात्र मोदी यांचा प्रस्ताव फेटाळून लावला आहे. नरेंद्र मोदी यांची अलिकडची सगळी भाषणं समाजात अविश्वास निर्माण करण्यासाठी पोषक असल्याची टीका पवार यांनी केली. ते आज पुण्यात पत्रकारांशी बोलत होते. आपला पक्ष गांधी-नेहरुंच्या विचारधारेवर चालतो. त्यामुळे अशा प्रस्तावाला पाठिंबा देता येणार नाही, असंही पवार यांनी स्पष्ट केलं.

काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही मोदी यांच्या या प्रस्तावावर टीका केली आहे. ते आज मुंबईत पत्रकारांशी बोलत होते होते. भाजपाने या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात सर्व प्रकारची कार्ड वापरली पण कोणतंच कार्ड चालत नसल्याने, मोदी यांना दररोज नवं कार्ड वापरावं लागत आहे, असं पटोले म्हणाले.

****

औरंगाबाद लोकसभा मतदार संघातले महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांच्या प्रचारासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आज छत्रपती संभाजीनगर इथं सभा घेणार आहेत. मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या मैदानावर ही सभा होणार आहे.

जालना इथंही महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ कल्याण काळे यांच्या प्रचारार्थ आज सभा होणार आहे.

****

औरंगाबाद लोकसभा मतदार संघातले महायुतीचे उमेदवार संदिपान भुमरे यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे आज छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर आहेत. महायुतीच्या घटक पक्षाच्या मेळाव्याला ते संबोधित करणार आहेत.

****

गेल्या वीस वर्षांमध्ये कोणत्याही खासदाराला छत्रपती संभाजीनगरचा पाणी प्रश्न सोडवता आलेला नाही, असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे लोकसभेचे उमेदवार अफसर खान यांनी केला आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. आदर्श सहकारी बँकेच्या घोटाळ्यातील ठेवीदारांना न्याय मिळवून देण्याचं आश्वासन विद्यमान खासदार सय्यद इम्तियाज जलील यांनी दिलं होतं, पण प्रत्यक्षात ५३८ ठेवीदारांवरच गुन्हा दाखल करण्यात आल्याकडे अफसर खान यांनी लक्ष वेधलं.

****

अहमदनगर लोकसभेचे महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील यांच्यासाठी उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी आज अहमदनगर इथं सभा घेतली, तर महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी जिल्ह्यातल्या भातकुडगाव फाटा इथं सभा घेतली.

****

'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात आजच्या भागात आपण भिवंडी आणि कल्याण लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून संध्याकाळी सव्वा सात वाजता प्रसारित होणारा हा कार्यक्रम सामाजिक संपर्क माध्यमांवरूनही ऐकता येईल.

****

मद्यधोरण प्रकरणी अटकेत असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाने १ जूनपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केला आहे. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि दीपंकर दत्ता यांच्या पीठानं आज हा निर्णय दिला. लोकसभा निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी न्यायालयानं केजरीवाल यांना ही मुभा दिली असून २ जून रोजी आत्मसमर्पण करण्यास सांगितलं आहे. केजरीवाल यांना २१ मार्च रोजी ईडीनं अटक केली होती, तेव्हापासून ते तिहार तुरुंगात आहेत.

****

अंधश्रद्धा निर्मुलन क्षेत्रात कार्यरत ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येप्रकरणी सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना पुण्यातल्या विशेष न्यायालयानं जन्मठेप आणि ५ लाख रुपये दंड ठोठावला आहे. या दोघांनी दाभोलकर यांच्यावर गोळी झाडल्याची कबुली दिली होती. मात्र या प्रकरणातले

अन्य आरोपी डॉ. विरेंद्र तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची न्यायालयानं पुराव्या अभावी, सुटका केली आहे. न्यायालयाच्या या निर्णयाचं दाभोलकर कुटुंबियांनी स्वागत केलं आहे. मात्र पुराव्याअभावी मुक्तता केलेल्यांना शिक्षा व्हावी यासाठी मुंबई उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचं दाभोलकर यांच्या कन्या मुक्ता दाभोलकर यांनी म्हटलं आहे. २० ऑगस्ट २०१३ रोजी पुण्यात सकाळी दाभोळकर यांची हत्या झाली होती.

****

औरंगाबाद लोकसभा निवडणूक येत्या १३ मे रोजी पार पडणार आहे. यासाठी प्रशासन सज्ज झाले असून मतदान प्रक्रियेची सर्व तयारी पूर्ण झाल्याची माहिती, जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत दिली. मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी विविध पुरस्कार देणार असल्याचंही आज जाहीर केलं. ७५ टक्क्यांपर्यंत मतदान झालेल्या गावांना आणि पंचायतींना समृद्ध लोकशाही गाव, ग्रामपंचायत पुरस्कार दिला जाणार आहे, तर ९० टक्क्यांपर्यंत मतदान झालेल्या गृहनिर्माण सोसायटी आणि १००० पेक्षा अधिक कामगार असलेल्या औद्योगिक संस्थांना देखील समृद्ध लोकशाही गृहनिर्माण सोसायटी आणि औद्योगिक संस्था पुरस्कार दिले जाणार आहेत.

****

जालना लोकसभा निवडणूक येत्या १३ मे रोजी होत असून, मतदानाच्या दिवशी जालना कृषी उत्पन्न बाजारसमितीचे व्यवहार बंद राहणार आहेत. शेतकऱ्यांनी या दिवशी बाजारपेठेत कृषी माल विक्रीसाठी आणू नये, असं बाजारसमितीच्या वतीने आवाहन करण्यात आलं आहे.

****

वैशाख शुद्ध तृतीया अर्थात अक्षय्य तृतीयेचा सण आज साजरा होत आहे. भगवान परशूराम आणि महात्मा बसवेश्वर जयंतीही आज साजरी होत असून, यानिमित्तानं शोभायात्रा, वाहनफेऱ्यांसह विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

छत्रपती संभाजीनगर इथं स्वामी विवेकानंद उद्यानात महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त जिल्हा महोत्सव समितीच्या वतीने मुख्य कार्यक्रम घेण्यात आला. भगवान परशुराम जयंतीनिमित्त औरंगपुरा इथं भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचं पूजन करण्यात आलं.

अक्षय तृतीया निमित्त आज धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूर इथं श्री तुळजाभवानी मातेची अलंकार महापूजा मांडण्यात आली. या निमित्ताने श्री छत्रपती शिवाजी महाराजांची कुलस्वामिनी असलेल्या आई तुळजाभवानीला श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी अर्पण केलेले विविध दागिन्यांची तसंच विविध अलंकारांची महापूजा आणि आंब्याची आरासही मांडण्यात आली होती. साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एक असलेल्या या अक्षय तृतीयेच्या निमित्ताने असंख्य भाविकांनी आज देवीचं दर्शन घेतलं.

****

नांदेड इथल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात आज महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. शशिकांत ढवळे यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

महात्मा बसवेश्वर यांनी १२ व्या शतकात अनुभव मंडपाच्या माध्यमातून सामाजिक समस्यावर आळा घातला, असं प्रतिपादन विठ्ठलराव ताकबीडे यांनी केलं आहे. नांदेड जिल्हा परिषदेत आज महात्मा बसवेश्वर यांना आज जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते.

****

नांदेड इथल्या खासगी वित्त कंपन्यांच्या कार्यालयावर आयकर विभागाने आज छापेमारी केली. आयकर विभागाचे कर्मचारी सकाळी सात वाजल्यापासून शहरातल्या शिवाजी नगरामधल्या पाच ते सात ठिकाणी तपास करत असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. नाशिक आयकर विभागातील जवळपास शंभर अधिकारी या कारवाईत सहभागी झाले होते.

****

रायगड जिल्ह्यात मुंबई–गोवा महामार्गावर पोलादपूरजवळ आज सकाळी झालेल्या भीषण अपघात तिघांचा जागीच मृत्यू झाला तर दोन जण जखमी झाले. चारचाकीने ट्रेलरला धडक दिल्याने हा अपघात झाला. दरम्यान, या अपघातामुळे काही काळासाठी महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

****

अमृतसर इथून सुटणारी अमृतसर नांदेड सचखंड एक्सप्रेसची परवा रविवारची फेरी रद्द करण्यात आली आहे. प्रवाशांना होणाऱ्या असुविधेबद्दल दिलगीर असल्याचं दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क कार्यालयानं कळवलं आहे.

****

इंडियन प्रिमियर लीग – आय पी एल क्रिकेट मध्ये आज गुजरात टायटन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सामना होणार आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी मैदानावर संध्याकाळी साडे सात वाजल्यापासून सामना सुरू होणार आहे.

****